# जाहीरात

जिल्हा सेतू समिती, जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड.

जिल्हा सेतू समिती, जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड मार्फत राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड या विभागात कंत्राटी पध्दतीवर निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात खालील प्रमाणे पदे भरती करावयाचे असून इच्छूक व पात्र उमेदवारांकडून खालील पदभरतीसाठी लेखी स्वरूपात अर्ज बंद पाकीटात मागविण्यात येत आहेत. सदर पदाचा कालावधी हा मा. श्रम व रोजगार मंत्रालयाच्या वेळोवेळीच्या मार्गदर्शक सुचनांवर अवलंबुन राहील.

| अ. क्र. | रिक्त पदाचे नाव | रिक्त पद संख्या | एकत्रित दरमहा मानधन रुपये | वयो मर्यादा | आर्हता |
|---|---|---|---|---|---|
| 01 | प्रकल्प संचालक | 01 | 24000/- | 30 ते 45 | 1) एम.एस.डब्ल्यु. उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. एम.बी.ए.उत्तीर्ण असल्यास प्राधान्य.<br>2) शैक्षणिक क्षेत्राचा अनुभव असावा.<br>3) शासकीय/निमशासकीय/शासनामार्फत राबविण्यात येणा-या उपक्रमासाठी काम केल्याचा किमान 5 वर्षाचा अनुभव असावा.<br>4) MS-CIT परीक्षा उत्तीर्ण आवश्यक आहे.<br>5) प्रशासकीय व लेखा विषयक कामाचे ज्ञान आवश्यक.<br>6) वर्ग एक व वर्ग दोन चे सेवानिवृत अधिकारी उपलब्ध झाल्यास प्राधान्य देण्यात येईल. |
| 02 | लिपीक तथा लेखापाल | 01 | 12000/- | 25 ते 38 | 1) कोणत्याही शाखेची पदवीत्तर पदवी उतीर्ण असणे आवश्यक आहे.<br>2) शासकीय किंवा सार्वजनिक क्षेत्रातील किमान 3 वर्षाचा अनुभव.<br>3) लेखा विषयांचे ज्ञान व MS-CIT परीक्षा उत्तीर्ण आवश्यक आहे.<br>4) टायपिंग मराठीची 30 श.प्र.मी.व इंग्रजीची 40 श.प्र.मी. परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. |
| 03 | डाटा ईंट्री ऑपरेटर / स्टेनो | 01 | 9000/- | 25 ते 38 | 1) पदवीधर असणे आवश्यक आहे.<br>2) लघुलेखन मराठी 30 श.प्र.मी.व 40 श.प्र.मी. इंग्रजी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.<br>3) लेखा विषयांचे ज्ञान व MS-CIT परीक्षा उत्तीर्ण आवश्यक आहे.<br>4) डाटा एंट्री ऑपरेटरचा कामाचा अनुभव असावा. |

सदर पदासाठी पात्र व ईच्छुक उमेदवारांनी दिनांक 05.10.2018 ते दिनांक 12.10.2018 या कालावधीमध्ये कार्यालयीन वेळेत विहीत नमुण्यात अर्ज परिपुर्ण भरून पदासमोर दर्शविलेल्या अर्हतेच्या छायांकित प्रतीसह बंद पाकिटामध्ये संगणक कक्ष, पहिला माळा, जिकारी कार्यालय, नांदेड येथे अर्ज सादर करावेत. सदर पदासाठी विहीत नमुण्यातील अर्ज व जाहिराती बाबत अधिक माहिती नांदेड जिल्हयाच्या https://nanded.gov.in/ या संकेस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहे त्यास्तव उक्त संकेस्थळास भेट दयावी. तसेच सदर पदभरती बाबतचे सर्व अधिकार/निर्णय जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष सेतू यांनी राखून ठवेले आहेत.

स्वाक्षरित/-

**जिल्हाधिकारी अध्यक्ष तथा**
**जिल्हा सेतू समिती, नांदेड**

# सर्वसाधारण अटी व शर्ती...

1. सदर पदासाठी अर्ज केलेल्या अ.क्र. 2 व 3 च्या उमेदवारांची संगणकीय परिक्षा घेण्यात येईल.
2. मुलाखतीस येते वेळेस आवश्यक मुळ प्रमाणपत्र व त्यांच्या साक्षांकित सत्यप्रती तसेच अलीकडील कालावधीतील पासपोर्ट आकाराचे किमान 3 फोटो सोबत आणावेत.
3. अर्जदारचा निवास पत्याचा पुरावा दाखला, निवडणुक ओळखपत्र किंवा आधारकार्ड व निवासाच्या विदयुत बिलाची प्रत सोबत आणावी तसेच सर्व मुळप्रती सोबत ठेवाव्यात.
4. अर्जासोबत शैक्षणिक पात्रतेच्या व अनुभवाच्या सत्यप्रती साक्षांकित करून जोडणे आवश्यक आहेत. प्रत्यक्ष मुलाखतीचे वेळी मुळ प्रती तपासणीसाठी उपलब्ध करून दयाव्या लागतील.
5. सदर नेमणुका ह्या निव्वळ कंत्राटी स्वरूपाच्या असुन त्या 11 महिन्यानंतर आपोआप संपुष्टात येतील किंवा आवश्यक असल्यास सदरच्या सेवा संबंधिताचे कामाचे प्रगतीनुसार पुढे चालु ठेवण्यात येतील.
6. सदरच्या सेवा ह्या निव्वळ कंत्राटी स्वरूपाच्या असल्यामुळे सेवा नियमित किंवा कायमपणाची कोणतीही मागणी करता येणार नाही किंवा अनुज्ञेय असणार नाही.
7. निवड झालेल्या उमेदवारास रूपये 100/ च्या बॉन्ड पेपरवर सेवेबाबत करारनामा करून देणे बंधनकारक आहे.
8. नियुक्त उमेदवारांकडुन आर्थिक किंवा इतर नुकसान झाल्यास ते संबधिताकडून वसुल करण्यात येईल. गुन्हाचे स्वरूप पाहुन वेळ प्रसंगी नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.
9. नियुक्त उमेदवारास पुर्णवेळ काम करणे बंधनकारक आहे. काम करतांना कुठल्याही प्रकारच्या अनपेक्षीत घटना/ अपघात इ. कारणामुळे शारिरीक इजा झाल्यास त्यांस तो स्वतः जवाबदार राहील. त्याबाबतची कोणतीही नुकसान भरपाई दिली जाणार नाही किंवा हे कार्यालय जवाबदार असणार नाही.
10. नियुक्त उमेदवारास त्यांचे स्वतःचे ईच्छेनुसार सेवा मुक्त व्हावयाचे असल्यास एक महिण्याची आगाउ नोटीस देणे बंधनकारक आहे. अशी नोटिस न दिल्यास व सेवा सोडुन गेल्यास एक महिन्याचे मानधन वसुल करण्यात येईल. परंतु संबधितांना कोणत्याही वेळी कोणतेही कारण न दर्शविता काढून टाकण्याचा किंवा सेवा कालावधी कमी करण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीतांना राहील.
11. प्राप्त अर्जाची छाननी करून पात्र उमेदवाराची सर्व पदासाठी मुलाखत व अ.क्र. 2 व 3 च्या संगणकीय परीक्षा व मुलाखत दिनांक व वेळे वेगळयाने नांदेड जिल्हयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. अपात्र ठरलेल्या उमेदवारांस कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही किंवा अर्ज नाकारण्या बाबतचे कारण कळविले जाणार नाही किंवा त्याबाबतची कोणतीही सबब ऐकुन घेतली जाणार नाही.
12. अर्जासोबत **e-suvidha collectorats Nanded** नावाने 100/ रूपया चा राष्ट्रीयकृत बॅकेचा धनाकर्ष नापरतावा म्हणून जोडणे बंधनकारक आहे.
13. सदर कंत्राटी तत्वावरील पद भरतीबाबतचा निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.
14. मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.
15. मुलाखतीस येताना एका राजपत्रित अधिकारी यांचे ''ओळख व चारित्र्य प्रमाणपत्र'' सोबत आणावे लागेल.
16. राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड मध्ये यापुर्वी कोणत्याही पदावरून कमी केलेल्या तसेच यापुर्वी कोणत्याही पदावरून काम सोडून गेलेल्या कोणत्याही व्यक्तीने अर्ज करू नये सदर अट ही अ.क्रं. 1 ते 3 या पदासाठी लागू राहील.
17. शासकीय नोकरीवरून सेवानिवृत झालेल्या अधिकारी यांच्यासाठी शैक्षणिक पात्रता, वय व अनुभवाची अट शिथील राहील.
18. निवड झालेल्या उमेदवाराच्या बाबतीत पोलीस प्रशासनाकडून चारित्र्य व वर्तणुकी बाबतचा अहवालास अधिन राहून रूजू करून घेण्यात येईल.
19. सदर पदभरतीचा दिनांक, वेळ यात बदल करण्याचे, प्रक्रिया रद्द करण्याचे, जाहीरातीतील अटी व शर्ती, पात्रता, वय यामध्ये बदल करण्याचे वा भरतीच्या अनुषंगाने सर्व अधिकार निवड समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी नांदेड यांना राहतील व ते राखून ठेवण्यात येत आहेत. याबाबत कोणतीही तक्रार व दावा करता येणार नाही.

स्वाक्षरित/-

**जिल्हाधिकारी अध्यक्ष तथा**
**जिल्हा सेतू समिती, नांदेड**

# उमेदवाराने सादर करावयाच्या अर्जाचा नमुना

प्रकल्प संचालक/  लिपीक तथा लेखापाल/  डि.ई.ओ. (डाटा एंन्ट्री ऑपरेटर)/स्टेनो पदासाठी अर्जाचा नमूना. (लागु नसेल ते खोडावे))

नजिकच्या
कालावधीत
काढलेला फोटो
चिकटवावा

प्रति,
मा. अध्यक्ष,
तथा जिल्हाधिकारी
जिल्हा सेतू समिती,नांदेड.

पदाचे नांवः-.........................................................................................................

1. उमेदवाराचे संपुर्ण नांवः-.......................................................................................
(आडनाव प्रथम लिहावे)
2. पत्रव्यवहाराचा पुर्ण पत्ताः- ..................................................................................
..................................................................................
.................................................................................
3. भ्रमणध्वनी/ दुरध्वनी क्र......................................................................................
4. इ मेल आयडी ......................................................................................
5. जन्म तारीख ( शालांत प्रमाणपत्र/ टि.सी. नुसार).................................................
6. **MS-CIT** परीक्षा उत्तीर्णतेचे वर्ष ........................................................................
7. यापुर्वी राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्पात काम केले आहे काय ............होय/ नाही...
8. शैक्षणिक पात्रताः- (इयता दहावीपासून देण्यात यावी)

| अ.क्र. | परिक्षेचे नांव | उर्तीर्ण वर्ष | मंडळ/ विदयापिठाचे नांव | प्राप्त टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

9. अनुभवाबाबतचा तपशिल ः-

A) शासकीय क्षेत्रातील

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव व पत्ता | पदनाम | मिळणारी वेतनश्रेणी/ मानधन | कालावधी |
|---|---|---|---|---|
| 1 | | | | |
| 2 | | | | |
| 3 | | | | |
| 4 | | | | |
| 5 | | | | |

B) निमशासकीय / खाजगी क्षेत्रातील

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव व पत्ता | पदनाम | मिळणारी वेतनश्रेणी/ मानधन | कालावधी |
|---|---|---|---|---|
| 1 | | | | |
| 2 | | | | |
| 3 | | | | |
| 4 | | | | |
| 5 | | | | |

टिपः- अर्जासोबत अनुभवाचे प्रमाणपत्र साक्षांकित करून जोडावे.

10. अर्जासोबत सादर केलेल्या प्रती

1. ः .......................................................................
2. ः ........................................................................
3. ः .......................................................................
4. ः .......................................................................
5. ः ........................................................................
6. ः .......................................................................
7. ः .......................................................................
8. ः ........................................................................
9. ः .......................................................................
10. ः ........................................................................

मी, खाली सही करणार प्रमाणित करतो की, उपरोक्त माहिती ही खरी असुन ती चुकीची आढळुन आल्यास मी कायदेशीर कारवाईस पात्र ठरेल. तसेच माझा अर्ज अवैद्य ठरल्यास मी कोणतीही तक्रार करणार नाही, अथवा न्यायालयाचा मार्ग अवलंबणार नाही.

स्थळः- ............................

दिनांकः-

(अर्जदाराचे स्वाक्षरी व नाव पत्ता व भ्रमनध्वनी क्रंमाक)